दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२५५०११२३
अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) यांचे
कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी ०२.०० ते ०२.३०
खात्याचा ई मेल :-
dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :-अपिल/३७/२०१६/उआ(सा.प्र.)/७९५
दिनांक :- २८/१०/२०१६

अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका
अपिल क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा. उआ(सा.प्र.)/अपिल /३७/२०१६

प्रति,
श्रीमती अंजना भागवत रणदिवे,
बी ८०/१२, सुपर इंदिरानगर,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७

--------------- अपिलार्थी

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

**श्रीमती अंजना भागवत रणदिवे** (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) **राहणार** : बी ८०/१२,सुपर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे - ४११ ०३७ .यांनी मा. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांचेकडे दि.१४/०९/२०१६ रोजी अर्ज करुन ''आपले खात्याकडील आज्ञापत्रक जा.क्र.उआ साप्र/आस्था/३०४३,दि.३/९/२०१५ यासंबंधी संपूर्ण फाईलमधील कागदपत्रांच्या प्रती '' इ. माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांनी दिनांक ३०/०९/२०१६ चे पत्रान्वये अपिलार्थी यांना जा.क्र.जमाअ/आस्था/३६८०,दि.३०/९/२०१६ ने पत्र पाठविले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| १४/९/२०१६ | १४/९/२०१६ | १४/१०/२०१६ | ३०/९/२०१६ | लागू नाही |

अपिलार्थीने मागविलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची नसल्याने माहिती मिळावी असे नमूद करुन अपिल अर्ज दि.१३/१०/२०१६ रोजी दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक | अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? |
| १३/१०/२०१६ | १३/१०/२०१६ | ३०/१०/२०१६ | होय | लागू नाही |

सदर अपिल अर्जावर दि.२७/१०/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा.प्रथम अपिल सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर अपिल सुनावणीस श्री.शाम तारु, प्रशासन अधिकारी,आस्थापना विभाग हे उपस्थित होते. अपिलार्थी श्रीमती अंजना भागवत रणदिवे या उपस्थित होत्या..

## विवेचन

अपिलार्थी यांनी मूळ अर्जात मागीतलेली माहिती वैयक्तिक नसल्याचे सांगीतले व माहितीची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागीतलेली माहिती द्यावी अगर कसे याबाबत लेखी कळविणेबाबत श्रीमती निर्मला मनोज रणदिवे यांना दि.१४/०९/२०१६ रोजी पत्र पाठविले आहे. त्याबाबत श्रीमती निर्मला मनोज रणदिवे यांनी माझी वैयक्तिक माहिती देवू नये असे दि.२६/९/२०१६ रोजी लेखी कळविले आहे. तथापी अपिलार्थी या कै.मनोज रणदिवे यांच्या आई असून त्यांनी कै.मनोज रणदिवे यांच्या जागी अनुकंपा तत्वावरील नोकरीच्या वारसहक्काबाबत प्रश्न उपस्थित होत असल्याने माहिती मिळावी अशी मागणी केली आहे.

## आदेश

अपिलार्थी यांचे दि.१४/९/२०१६ चे मूळ अर्जात मागीतलेली माहिती पुढील पाच दिवसांत अपिलार्थी यांना देण्यात यावी.

27/10/2016

(प्रकाश बोरसे)
अपिल प्राधिकारी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

**टीप:** सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय ईमारत, ४ था मजला, पुणे – १ यांचेकडे द्वितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

प्रत :-
जनमाहिती अधिकारी
आस्थापना विभाग
पुणे मनपा